भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार )

जा.क्र. ८३४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/१२/२०१६

१) निष्काजीपने वाहण चालवुन इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :-

दिनांक २१/१२/२०१६ रोजी ११.२० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक रॉग साईडने निष्काळजीपने व हयीगयीने चालवुन समोरून येणाऱ्या अल्फा बिना नंबरच्या मोटार सायकलला धडक मारून चालक विक्रांत भेंडारकर व ईश्वर मेश्राम याचे अपघात करून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सरतर्फे पोहवा रेहपाडे यांचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९, ३३७, ३३८ भादवी. सहकलम २ आर.आर.आर. १७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी पाटील पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

२) गळफास लावुन इसमाचा मृत्यु. :-

दिंनाक २१/१२/२०१६ चे ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी रमेश किशन देशमुख वय ४० वर्ष रा. आकोट हा त्याचे शेतावर गेला असता मृतक दुर्योधण किसन देशमुख वय ५० वर्ष रा. आकोट हा कंळबाचे झाडाला नाल्यलान दोरीने गळफास लावुन मरण पावल्याचे स्थितीत दिसुन आलयाने फिर्यादीचे तोंडी रिपोट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहे.

३) विषारी औषध प्राशन करून उपचारा दरम्यान इसमाचा मृयु . :-

दिंनाक १४/१२/२०१६ चे २०.०० वा. ते १८/१२/१६ चे १७.०० वा. दर. यातील मृतक आपले घरी तुळीवर मारणारी विषारी औषध प्राषन केल्याने त्यास उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारादरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मग्र क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.शी. ब्रम्हण ब.न. १३५२ यांनी आणुन पेश केल्याने सरतर्फे फिर्यादीचे तोंडी रिपोट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. दिक्षीत पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहे.

४) चिमुकलीला बिबटया वाघाने मारल्याने गुन्हा नोंद. :-

दिंनाक २१/१२/२०१६ चे १७.०० वा. दर. यातील मृतक कु. खुशी राजेद्र सराटे वय ०५ वर्ष रा. चिखलाबोडी ही घरा शेजारील आजी सौ. शांताबाई गजिराम वरखडे हीचे सोबत तिचे शेतावर गेली असता मृतक मुलगी हीला बिबटया वाघाने मारल्याने मरण पावली आहे असे फिर्यादी देवदास जयदेव मेश्राम वय ३० वर्ष रा. चिखलाबोडी यांचे तोंडी रिपोट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पो. स्टे. लाखनी हे करीत आहे.

४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-

दिनांक २१/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ६२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहनाकरीता ०१ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ०३ केसेस व ईतर वाहनांवरती ५८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

for प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९५५२५६५८५२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.